# मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ.

## दि.०९/११/२०११ रोजी झालेल्या मंडळाच्या २७४ व्या बैठकीचे कार्यवृत्त.

बुधवार दि.०९/११/२०११ रोजी दुपारी ०४.३० वाजता भारतरत्न गुलझारीलाल नंदा सभागृह, तिसरा मजला, गृहनिर्माण भवन, वांद्रे - पूर्व, मुंबई - ४०० ०५१ येथे बैठक बोलाविण्यात आली होती. मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या दि.०९/११/२०११ रोजी संपन्न झालेल्या २७४ व्या बैठकीचे इतिवृत्त.

सदर बैठकीस खालील सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

१. डॉ. श्री. अमरजीतसिंग मनहास, मा. सभापती/मुं.मं.

२. श्री. विरेंद्र उपाध्याय, मा. सदस्य/मुं.मं.

३. श्री. रमेश शेट्टी, मा. सदस्य/मुं.मं.

४. श्री. जया पेंगल, मा. सदस्य/मुं.मं.

५. श्री. भरत पारेख, मा. सदस्य/मुं.मं.

६.. श्री. सुनिल नरसाळे, मा. सदस्य/मुं.मं.

सचिव /मुं.मं. यांनी बैठकीस उपस्थित मा. सभापती, मा.उप सभापती तथा मुख्य अधिकारी /मुं.मं., सहमुख्य अधिकारी /मुं.मं. सर्व सन्मा.सदस्य व मुंबई मंडळाचे अधिकारी /कर्मचारी यांचे मुंबई मंडळाच्या २७४ व्या बैठकीत हार्दिक स्वागत केले.

सन्मा.सदस्य व आमदार श्री.कृष्णा हेगडे हे कार्यव्यस्ततेमुळे आजच्या बैठकीस उपस्थित राहू शकत नसल्याचे सचिवांनी सभागृहास सांगितले. सन्मा.सदस्य व आमदार श्री.कृष्णा हेगडे यांच्या अनुपस्थितीची नोंद घेण्यात आली.

डॉ. अमरजीत सिंग मनहास साहेब, मा. सभापती /मुं.मं. यांच्या परवानगीने विषय सूचीवरील विषय चर्चेस घेण्यात आले.

**बाब क्र. २७४/०१ :- दि.०४/११/२०११ रोजी झालेल्या मुंबई मंडळाच्या २७३ व्या बैठकीचे कार्यवृत्त स्थायी करणे.**

सचिव/मुं.मं. यांनी दि.०४/११/२०११ रोजीच्या मुंबई मंडळाच्या २७३ व्या बैठकीचे कार्यवृत्त स्थायी करण्याचा प्रस्ताव सभागृहासमोर सादर केला.

सचिव /मुं.मं. यांनी सभागृहास सांगितले की, मा.उप सभापती तथा मुख्य अधिकारी दि.०४/११/२०११ रोजी मंत्रालयात बैठकीस गेल्यामुळे व मा.सह मुख्य अधिकारी यांची वेळे अभावी दि.०४/११/२०११ रोजीच्या २७३ व्या बैठकीच्या कार्यवृत्तावर त्यांचे स्वाक्षरी शिवाय कार्यवृत्त सर्व सन्मा.सदस्यांना पाठविण्यात आले होते. मा.उप सभापती तथा मुख्य अधिकारी /मुं.मं. हे बैठकीस उपस्थित नसल्यामुळे स्वाक्षरी केलेली नाही. सह मुख्य अधिकारी /मुं.मं. यांनी कार्यवृत्तावर सही केलेली आहे. व विषय सूचीतील पृष्ठ क्र.२७ मध्ये खालून दुस-या ओळीत "सह मुख्य अधिकारी यांनी सांगितले की, रस्ता रुंदी करणात बाधित दुकानांचे पुनर्वसन करण्याची जबाबदारी म.न.पा.ची आहे. त्यांनी ती करावी." अशी दुरुस्ती सुचविलेली आहे. सभागृहाने दुरुस्तीची नोंद घेण्याची विनंती केली.

मा.उप सभापती तथा मुख्य अधिकारी /मुं.मं. यांनी सभागृहास सांगितले की, विषयसूचीतील पृष्ठ क्र.४९ वरील मुद्दा क्र.५ ओशिवरा अंधेरी (प.) येथील ८११ अनिवासी झोपडीधारकांना सुधारित विकास नियंत्रण नियमावली ३३(५) अंतर्गत २.५ चटई क्षेत्र निर्देशांक लागू करणेबाबत मुद्दा चर्चेत उपस्थित झाला होता. मुंबई मंडळाच्या मागील बैठकीत मी उपस्थित नव्हतो.

चर्चेच्या वेळेस "मा.सभापती /मुं.मं यांनी सभागृहास सांगितले होते की, सदरहू प्रस्ताव मुख्य अधिकारी /मुं.मं. यांच्यामार्फत परस्पर प्राधिकरणाच्या बैठकीत सादर करण्यात आला होता. मा.सभापती /मुं.मं. यांनी मा.उपाध्यक्ष /प्रा.यांना दि.१३/१०/२०११ रोजीच्या पत्रान्वये निषेध नोंदविला आहे. सुधारित विकास नियंत्रण नियमावली ३३(५) अंतर्गत २.५ चटई क्षेत्र निर्देशांक अनिवासी आणि झोपडपट्टींना लागू होत नाही, अशी धारणा आहे."

याबाबत काही वृत्तपत्रामध्ये चुकीचे वृत्त प्रसिध्द झाले आहे ज्यामुळे जनतेची दिशाभूल होते आणि त्यामुळे मला वस्तुस्थितीचा खुलासा करणे आवश्यक आहे.

सदरहू प्रस्ताव मुख्य अधिकारी /मुं.मं. यांनी मांडलेला नाही. हा संयुक्त पुनर्विकासाचा प्रस्ताव मूळतः उप मुख्य अभियंता (स्थापत्य) आणि वास्तुशास्त्रज्ञ /मुं.मं. यांचेमार्फत प्रस्तावित करण्यात आला होता. त्यामुळे ''मुख्य अधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला नाही अशी दुरुस्ती करण्यात यावी. वास्तुशास्त्रज्ञ /मुं.मं. यांनी दि.२४/०६/२०११ रोजी तत्कालीन मुख्य अधिकारी यांचेकडे सादर केला होता. त्यावेळी मुख्य अधिकारी म्हणून श्रीमती. मेघा शेंडे यांचेकडे कदाचित चार्ज होता. त्यामुळे हा प्रस्ताव मी सादर केला नाही. तद्नंतर प्रस्ताव मुख्य अभियंता -२ प्रा.यांचेकडे गेला होता. मुख्य अभियंता -२ प्रा. यांनी "principally we may approve the option 5 on approval for the details calculation for issuing L.O.I. can be worked for entering into agreement of joint venture." असा अभिप्राय दिला आहे.

मुख्य अभियंता -२ प्रा. यांनी सदरहू प्रस्ताव विधी सल्लागार /प्रा. यांचेकडे सादर केला. विधी सल्लागार /प्रा. यांचे अभिप्राय नंतर प्रस्ताव मा.उपाध्यक्ष /प्रा. यांचेकडे सादर करण्यात आला. मा.उपाध्यक्ष /प्रा. यांनी संयुक्त प्रस्तावात घेण्यास मान्यता दिली. मुख्य अभियंता /प्रा. यांनी मुख्य अधिकारी /मुं.मं. यांचेकडे नस्ती पाठविली. नस्तीमध्ये मुख्य अभियंता / प्रा. यांनी ''Hon.V.P./A as approved proposal in principal C.O./M.B. is requested instruct Deputy C.E. / Works / M.B. to prepared detail item note place before Authority'' असे आदेश मुख्य अधिकारी / मुं.मं. यांना दिले होते. मा.उपाध्यक्ष /प्रा. यांनी संयुक्त प्रस्तावास मान्यता दिली आहे. मुख्य अभियंता / प्रा. यांच्या आदेशानुसार याबाबतची सविस्तर बाब टिप्पणी मी मुख्य अधिकारी असल्यामुळे माझे मार्फत सादर झाली होती. बाब टिप्पणी व प्रस्ताव मंजूर करणारे बरेच वरिष्ठ अधिकारी आहेत. बाब टिप्पणी माझ्याकडे आल्यानंतर माझे शेरे नोंदले आहेत. मंडळाच्या धोरणानुसार २-सी (i) प्रमाणे

बांधीव हिस्सा घेण्याचा अभिप्राय देण्यात आला होता. मा.सभापती /मुं.मं. यांनी नमुद केलेले ''मंडळामार्फत प्राधिकरणास सादर करावयाचे प्रस्ताव मा.सभापती /मुं.मं. यांचे निदर्शनास आणून सादर करण्याबाबत'' मा.उपाध्यक्ष /प्रा. यांचे पूर्वीचे परिपत्रकाबाबत मला कल्पना नव्हती. ज्या अधिकाऱ्यांनी अथवा विभागाने बाब टिप्पणी तयार केली त्यांची ही जबाबदारी आहे. संबंधीत अधिकाऱ्यांनी अथवा विभागाने ही बाब माझ्या निदर्शनास आणली असती तर बाब टिप्पणी व प्रस्ताव मा.सभापती / मुं.मं. व मुंबई मंडळामार्फत प्राधिकरणास सादर केली असती. संबंधीत विभागाने नस्तीमध्ये मा.सभापती / मुं.मं. यांचेमार्फत प्राधिकरणास सादर करण्याचा मार्गीका नमुद केली नसल्यामुळे नस्ती मुख्य अधिकारी / मुं.मं. यांचेमार्फत प्राधिकरणाकडे सादर केली आहे. मुख्य अधिकारी म्हणून म्हाडाच्या हिताचा प्रस्ताव २-सी (i) प्रमाणे गाळे मिळावेत असे नमूद केले व हे योग्य आहे. मुद्दा क्र. ५ मध्ये मी हेतूपुरस्पर परस्पर प्राधिकरणाकडे सादर केला असे स्पष्ट होत नाही. याची सभागृहाने नोंद घ्यावी. संबंधीत विभागाने अथवा संबंधीत अधिकाऱ्याने मुख्य अधिकारी / मुं.मं. यांना मा.उपाध्यक्ष / प्रा. यांचे परिपत्रक निदर्शनास आणण्याची जबाबदारी अथवा नस्तीमध्ये मा.सभापती / मुं.मं. यांचेकडे नस्ती निर्देशीत करण्याची जबाबदारी होती त्यांनी ती केली नाही यांचे विरुध्द मंडळाला काही कार्यवाही प्रस्तावित करावयाची असल्यास त्याबाबत मंडळ निर्णय घेऊ शकते.

मा.सभापती / मुं.मं. यांनी सभागृहास सांगितले की, मागील सभेचे कार्यवृत्त स्थायीकरणाचा प्रस्ताव होता. मा.मुख्य अधिकारी / मुं.मं. यांनी कार्यवृत्त स्थायीकरणाच्या प्रस्तावा व्यतिरिक्त त्यांचा खुलासा दिलेला आहे. कार्यवृत्तामध्ये कोठेही श्री.मिसाळ यांनी हे केले आहे, हे नमूद केले नाही. मा.मुख्य अधिकारी यांनी मा.उपाध्यक्ष / प्रा. यांचेकडे विविध अधिकाऱ्यांमार्फत सादर केल्याचे नमुद केले आहे. श्री.गौतम चॅटर्जी, मा.उपाध्यक्ष / प्रा. यांचे प्राधिकरणाकडे मुंबई मंडळाकडून येणारे प्रस्ताव मा.सभापती / मुं.मं. यांच्या सूचनेसह सादर करावेत, असे परिपत्रक आहे. यापूर्वीच्या मुख्य अधिकाऱ्यांनी जेंव्हा जेंव्हा अशाप्रकारे परस्पर प्रस्ताव प्राधिकरणास सादर केला आहे. मा.सभापती / मुं.मं. यांनी मा.उपाध्यक्ष / प्रा. यांच्या

निदर्शनास ही बाब आणून दिल्यानंतर मा.उपाध्यक्ष / प्रा. यांनी मा.सभापती / मुं.मं. यांचेकडे लेखी पत्राद्वारे खेद व्यक्त केला आहे. विद्यमान मा.मुख्य अधिकारी / मुं.मं. यांना ही बाब माहित नाही याचे आश्चर्य व्यक्त करुन सभागृह नोंद घेत आहे. यापुढे मंडळाच्या सर्व अधिकाऱ्यांनी मा.उपाध्यक्ष / प्रा. यांच्या परिपत्रकाची दखल घ्यावी आणि प्राधिकरणाकडे सादर करण्यात येणारे सर्व प्रस्ताव मा.सभापती / मुं.मं. यांचे कार्यालयाकडे पाठविण्यात यावेत. मा.सभापती / मुं.मं. यांना आवश्यकता भासल्यास मंडळापुढे विचारार्थ ठेवतील किंवा सन्मा. सदस्यांशी विचारविनिमय करुन अभिप्रायासह प्राधिकरणाकडे पाठवतील. मा.सभापती / मुं.मं. यांना मा.मुख्य अधिकारी / मुं.मं. यांचेबाबत कोणताही दुराग्रह नाही. मा.सभापती / मुं.मं. यांनी कार्यपध्दतीबाबत विरोध दाखविला आहे. अन्य सदस्यांनी सुध्दा कार्यपध्दतीबाबत विरोध दाखविला आहे. ओशिवरा अंधेरी (प.) येथील ८११ अनिवासी झोपडीधारकांना सुधारित विकास नियंत्रण नियमावली ३३(५) अंतर्गत संयुक्त पुनर्विकास प्रस्तावाबाबतची बाब टिप्पणी प्राधिकरणासमोर मंजूर करण्यात येऊ नये याबाबत प्राधिकरणाच्या तिन्ही सदस्यांना मा.मुख्य अधिकारी अथवा संबंधीत अधिकारी यांनी प्राधिकरणाकडे पाठविण्याचे प्रस्ताव मा.सभापती / मुं.मं. यांचेमार्फत पाठविण्यात यावेत याकरीता एस.एम.एस.द्वारे निदर्शनास आणले आहे. याबाबत प्राधिकरणाच्या संबंधीत सदस्यांकडून प्रतिसाद प्राप्त झाला आहे. याबाबत प्राधिकरण स्तरावर चर्चा चालू असून प्राधिकरणस्तरावर निर्णय होईल. मा.सभापती / मुं.मं. यांनी त्यांची हरकत प्राधिकरणाकडे नोंदविली आहे. मा.सभापती / मुं.मं. यांचेकडे नस्ती आल्यास त्यावर ते अभिप्राय देऊ शकतात. मा.सभापती / मुं.मं. यांनी सदर प्रकरणी प्राधिकरणाकडे हरकत घेतली आहे. मा.मुख्य अधिकारी आणि संबंधीत अधिकारी यांना याबाबत माहिती व्हावी याकरीता मा.सभापती / मुं.मं. यांनी हरकत घेऊन ही बाब निदर्शणास आणली आहे. सभागृह याची नोंद घेत आहे.

सचिव / मु.मं. यांनी सभागृहास सांगितले की, दि. ०४/११/२०११ रोजीच्या २७३ व्या बैठकीचे ऑडिओ रेकॉर्डिंग झालेले नाही याची सभागृहाने नोंद घेण्याची विनंती केली. सभागृहाने नोंद घेतली.

मा.सभापती / मुं.मं. यांनी चालू बैठकीचे ऑडिओ रेकॉर्डिंग सुरळीत चालू आहे का ? अशी विचारणा केली. सचिव / मुं.मं. यांनी ऑडिओ रेकॉर्डिंग सुरळीत असल्याचे सभागृहास सांगितले. मा.सभापती / मुं.मं. यांनी कार्यवृत्त स्थायी करण्याची सूचना केली.

सन्मा.सदस्य श्री.विरेंद्र उपाध्याय यांनी विषयसूचीतील पृष्ठ क्र. १५ वरील ठराव क्र. २७३/३००६, दि. ०४/११/२०११ मध्ये सुरुवातीस ''मे.धनश्री डेव्हल्पर्स यांना मे.सदगुरु बिल्डर्स ॲन्ड डेव्हल्पर्स सारखी पत्र देण्यात यावे.'' हे वाक्य समाविष्ठ करण्याची सूचना केली. याबाबत चर्चा झाली होती परंतू ठरावात हे वाक्य आलेले नाही.

मा.सभापती / मुं.मं. यांनी सभागृहास सांगितले की, ही बाब चर्चेमध्ये आलेली आहे. त्यामुळे ''मे.धनश्री डेव्हल्पर्स यांना मे.सदगुरु बिल्डर्स ॲन्ड डेव्हल्पर्स सारखी पत्र देण्यात यावे.'' हे वाक्य समाविष्ठ करण्यात यावे.

सभागृहाने विषयसूचीतील पृष्ठ क्र. १५ वरील ठराव क्र. २७३/३००६, दि. ०४/११/२०११ मध्ये सुरुवातीस ''मे.धनश्री डेव्हल्पर्स यांना मे.सदगुरु बिल्डर्स ॲन्ड डेव्हल्पर्स सारखी पत्र देण्यात यावे.'' हे वाक्य समाविष्ठ करण्यास मान्यता दिली.

सन्मा. सदस्य श्री. विरेंद्र उपाध्याय आणि सहमुख्य अधिकरी / मुं.मं. यांनी कार्यवृत्तात सूचविलेले दुरुस्ती करुन दुरुस्तीसह मुंबई मंडळाच्या दि. ०४/११/२०११ रोजीच्या २७३ व्या बैठकीचे कार्यवृत्त स्थायी करण्यात आले.

मा.सभापती / मुं.मं. यांनी कार्यवृत्ता व्यतिरिक्त अन्य प्रश्न असल्यास विचारण्यास सभागृहास अनुमती दिली.

सन्मा.सदस्य श्री.विरेंद्र उपाध्याय मुंबई मंडळाचे मुख्य अधिकारी श्री.आण्णासाहेब मिसाळ यांनी प्राधिकरण ठराव क्र. ६३४९, दि. २५/११/२००८ च्या विरोधात जाऊन

टीटबीट बाबतच्या नस्ती परस्पर प्राधिकरणास सादर केले आहे. मा.मुख्य अधिकारी वारंवार या चूका करतात असे स्पष्ट होते.

मा.सभापती / मुं.मं. यांनी सभागृहास सांगितले की, याबाबत आपण चर्चा केलेली आहे. मा.उपाध्यक्ष / प्रा. यांचेशी सुध्दा चर्चा झालेली आहे.

सन्मा. सदस्य श्री.विरेंद्र उपाध्याय यांनी प्रशासनाकडील वारंवार चुका होणे योग्य नसल्याचे मत व्यक्त केले.

मा.सभापती / मुं.मं. यांनी खुलासा केला की, प्रशासनामार्फत झालेल्या चुकांवर कार्यवाही करता येईल. तथापि मंडळाला कार्यवाही करण्यापेक्षा अधिकाऱ्यांकडून चांगल्याप्रकारे काम करुन घेणे योग्य राहील. प्रशासनामार्फत या सर्व बाबींची दखल घेण्यात येईल.

**बाब क्र. २७४/०२ :- सहकार नगर, चेंबूर या म्हाडा वसाहतीतील इमारत क्र. २, १४, १६, १७, १९, २० ते २४, २८, ते ३३, ३५, ३७ आणि ३९ सहकार नगर सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. न.भू.क्र. ४९ (भाग) ५४, ४५, ५८ (भाग) या इमारतीच्या पुनर्विकासाकरीता सुधारित विकास नियंत्रण नियमावली ३३(५) नुसार म्हाडाकडून ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त करण्यासाठी सादर झालेला प्रस्ताव.**

श्री. सुर्यकांत तेली, सचिव/मुं.मं. यांनी बाब सभागृहासमोर सादर केली.

सहकार नगर, चेंबूर या म्हाडा वसाहतीतील इमारत क्र. २, १४, १६, १७, १९, २० ते २४, २८, ते ३३, ३५, ३७ आणि ३९ सहकार नगर सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. या संस्थेच्या पुनर्विकासाचा प्रस्ताव मुंबई मंडळाच्या दि. २०/०५/२०११ रोजीच्या २६६ व्या बैठकीत ठराव क्र.२६६/२९६० अन्वये मंजूर झाला आहे. सदरहू ठरावानुसार अधिमूल्याद्वारे म्हाडास रु. ३९,१२,९३,२६५/- एवढे अधिमूल्य मिळणार होते.

तद्‌नंतर सन्मा.सदस्य श्री.विरेंद्र उपाध्याय यांनी मुंबई मंडळाच्या दि. २९/०७/२०११ रोजीच्या २६८ व्या बैठकीत सहकार नगर, चेंबूर इमारत क्र. २, १४, १६, १७, १९, २० ते २४, २८, ते ३३, ३५, ३७ आणि ३९ सहकार नगर सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. या संस्थेच्या पुनर्विकासाच्या प्रस्तावावर विचारणा केली. त्यावेळेस ठराव क्र. २६८/२९८१, दि. २९/०७/२०११ अन्वये मुंबई मंडळाचा ठराव क्र. २६६/२९६०, दि. २०/०५/२०११ अन्वये कार्यवाही करण्याची सूचना केली होती.

आता प्रशासनामार्फत सूधारित प्रस्ताव सादर केला आहे. सुधारित प्रस्तावानुसार मंडळास ३०० चौ.फुट चटई क्षेत्रफळाच्या ३८ विनामूल्य सदनिका आणि रुपये ३८,२५,०८,५८६/- एवढे अधिमूल्य संस्थेकडून घेण्याचे प्रस्तावित आहे. त्यानुसार मुंबई मंडळाचा ठराव क्र. २६६/२९६०, दि. २०/०५/२०११ मध्ये सुधारणा करणेबाबत मंडळाच्या विचारार्थ निर्णयार्थ प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

सन्मा.सदस्य श्री.विरेंद्र उपाध्याय यांनी सुधारित प्रस्ताव संस्थेस मान्य असल्यास मंडळाने सुधारित प्रस्तावास मान्यता द्यावी, असे सभागृहास सांगितले. सभागृहाने सुधारित प्रस्तावास मान्यता दिली.

मा.सभापती / मुं.मं. यांनी सभागृहास सांगितले की, मुंबई मंडळ नियमानुसार २-सी (i) प्रमाणे मान्यता देत आहे. या प्रस्तावातुन म्हाडास ३०० चौ.फुटाच्या ३८ सदनिका विनामूल्य मिळणार आहेत. त्यामुळे या सदनिका सोडतीद्वारे जनतेस देता येतील.

सर्व सन्मा.सदस्यांनी चर्चेत भाग घेतला आणि एकमताने ठराव केला की,

**ठराव क्रमांक २७४/३०१२** **दिनांक : ०९/११/२०११**

**सहकार नगर, चेंबूर या म्हाडा वसाहतीतील इमारत क्र. २, १४, १६, १७, १९, २० ते २४, २८, ते ३३, ३५, ३७ आणि ३९ सहकार नगर सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या.** या संस्थेचा पुनर्विकासाचा प्रस्ताव मुंबई मंडळाचा ठराव क्र. २६६/२९६०, दि. २०/०५/२०११ अन्वये मुंबई मंडळाने मंजूर केला आहे. प्रशासनाने सुधारित प्रस्ताव सादर केल्यानुसार मुंबई मंडळाच्या मंजूर ठराव क्र. २६६/२९६०, दि. २०/०५/२०११ मधील मुद्दा क्र. ३ मधील दुसऱ्या परिच्छेदात ''उर्वरित २६२८२.१७ चौ.मी. क्षेत्रफळातून २५२३२.१७ चौ.मी. रहिवासी वापरासाठी'' या वाक्यामधील २५२३२.१७ चौ.मी. ऐवजी २४६२२.१२ चौ.मी. अशी सुधारणा करण्यात यावी.

आणि मुद्दा क्र. ४ मध्ये ''संस्थेच्या इमारती लगत असलेले आर-८ भूखंड आर-६ व आर-७ निविदा दर तत्कालीन रेडीरेकनर दराच्या ज्या पटीमध्ये आहेत त्याच पटीमध्ये प्रचलित रेडीरेकनर दराच्या पटीत घेण्याचे प्रस्तावित आहे.'' या ऐवजी ''संस्थेने ३०० चौ.फुट चटई क्षेत्रफळाच्या ३८ सदनिका विनामूल्य म्हाडास द्याव्यात.'' हे वाक्य समाविष्ट करण्यात यावे.

ठराव एकमताने मंजूर.

# मा.सभापती / मुं.मं. यांच्या परवानगीने आलेले इतर विषय.

(१) मा.सभापती / मुं.मं. यांच्या परवानगीने मुंबई मंडळामार्फत दि. १४/११/२००७ ते दि. ०४/११/२०११ या कालावधीत घेण्यात आलेल्या मुंबई मंडळाच्या बैठकीतील सन्मा.सदस्यांच्या उपस्थितीबाबतचा तक्ता सभागृहासमोर सादर केला. आणि याची प्रत सर्व सन्मा.सदस्यांना देण्यात आली.

(२) मा.सभापती / मुं.मं. यांच्या परवानगीने कार्यकारी अभियंता-१ व २ एस.आर.डी. विभाग दि. ३१/०५/२०११ रोजी काढण्यात आलेल्या सदनिकांच्या सोडतीतील सदनिकांच्या सद्यःस्थितीबाबतची माहितीची प्रत सभागृहास देण्यात आली.

(३) सन्मा. सदस्य श्री. विरेंद्र उपाध्याय यांनी सी.टी.एस. सर्व्हे नं. ६०२ (भाग) वांद्रे (पूर्व) येथील अनंत कान्हेकर मार्ग येथे इंदिरा गांधी रहिवासी संघ को-ऑप. सोसायटी पुनर्विकास योजनेमधील वांद्रे (पू) येथील बस टर्मिनस करण्याबाबतचा मुद्दा उपस्थित केला. सदर झोपडपट्टी पुनर्रवसन ५००० चौ.मी. चे बस टर्मिनस बेस्टच्या स्पेसीफिकेशन नुसार बांधून बेस्टला हस्तांतरीत करावयाचे आहे. सदरहू बेस्ट टर्मिनस बेस्टला हस्तांतरीत न झाल्यामुळे वांद्रे स्टेशन परिसरात वाहतूकीची प्रचंड कोंडी होत आहे. नागरीकांची गैरसोय टाळण्यासाठी म्हाडाच्या संबंधीत अधिकाऱ्यांनी याबाबत सहकार्य करावे, अशी सूचना केली.

मा.उपसभापती तथा मुख्य अधिकारी / मुं.मं. यांनी उपमुख्य अभियंता/स्थापत्य/मुं.मं. यांना याबाबतची नस्ती तात्काळ सादर करण्याबाबतची सूचना केली. तसेच हेतुपूरस्पर कोणी अधिकारी विलंब करीत असेल तर शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात यावी.

(४) सन्मा.सदस्य श्री.विरेंद्र उपाध्याय यांनी घाटकोपर (पू) येथील महात्मा फुले गृहनिर्माण सहकारी संस्था आणि गुरुकृपा गृहनिर्माण सहकारी संस्था यांच्यातील वादामुळे महात्मा फुले गृहनिर्माण संस्थेवरती अन्याय होत असून सदरहू भूखंडाचा विकास म्हाडाने करावा याबाबत सविस्तर प्रस्ताव प्राधिकरणास व एस.आर.ए. ला सादर करावा, अशी सूचना केली.

मा.उपसभापती तथा मुख्य अधिकारी / मुं.मं. यांनी सहमुख्य अधिकारी / मुं.मं. यांना विचारणा केली.

सहमुख्य अधिकारी / मुं.मं. यांनी मंडळाने निर्णय घेतला असल्याचे सांगितले.

मा.सभापती / मुं.मं. यांनी मंडळाच्या निर्णयानुसार कार्यवाही करण्याच्या सूचना केल्या.

(५) सन्मा.सदस्य श्री.विरेंद्र उपाध्याय यांनी वांद्रे (प) येथील क्रीडा संकुल भूखंडाची मा.आमदार श्री.बाबासिद्दकी साहेब यांनी मागणी केलेल्या भूखंडावरील पूर्वीच्या संस्थांना कळविण्याबाबत सूचना केली होती. त्यानुसार पूर्वीच्या संस्थाने त्यांची पत्रे स्वीकारली नाहीत.

मा.सभापती / मुं.मं. यांनी खुलासा केला की, संबंधीत संस्थाने सहा महिन्याच्या कालावधीत कार्यवाही न केल्यास त्यांचे प्रस्ताव आपोआप रद्द होतात.

मा.सभापती / मुं.मं. यांनी टीटबीट धोरणाबाबत खुलासा केला की, मुंबईतील कांही आमदार महोदयांनी त्यांचेकडे निवेदन दिले आहे की, म्हाडाचे टीटबीटबाबतचे धोरण म्हाडाने धोरण स्वीकारल्याच्या तारखेपासून अंमलात आणण्यात यावे. त्या धोरणापूर्वीचे प्रस्ताव व त्यावरील चटई क्षेत्रफळ निर्देशांक पूर्वीच्या धोरणाप्रमाणेच वितरीत करण्यात यावेत. मुंबई मंडळ मा.आमदार महोदयांच्या निवेदनाप्रमाणे कार्यवाही करण्यास संमती दर्शवित आहेत. यावर सर्व सन्माननीय सदस्यांनी चर्चेत भाग घेतला आणि एकमताने ठराव केला की,

**ठराव क्र. २७४/ ३०१३ दिः ९/११/२०११**

मुंबईतील मा. आमदार महोदयांनी मा.सभापती / मुं.म. यांना सादर केलेल्या निवेदनानुसार मुंबई मंडळामार्फ़त यापूर्वी वितरीत केलेले टिटबिट भुखंड हे आता टिटबिट भूखंडाऐवजी मूळ भूखंडाचा भाग मानण्यात यावा. टिटबिट भूखंडाबाबत म्हाडाचे सुधारीत धोरण निश्चित होईपर्यंत टिटबिट भूखंडाबाबत म्हाडाच्या पूर्वीच्या ठरावानुसार कार्यवाही करण्यास मुंबई मंडळ प्रशासनास मंजुरी देत आहे.

ठराव एकमताने मंजुर.

सन्मा. सदस्य श्री.विरेंद्र उपाध्याय यांनी टीटबीट बाबतचा मुद्दा वारंवार येत असल्याबाबतची नाराजी व्यक्त केली.

मा.सभापती / मुं.मं. यांनी टीटबीट धोरणाबाबत आता स्पष्टता झालेली आहे, असे सभागृहास सांगितले.

मा.उपसभापती तथा मुख्य अधिकारी / मुं.मं. यांनी मा.सभापती / मुं.मं. यांनी मोलाचे मार्गदर्शन केल्याबद्दल त्यांचे आभार व्यक्त केले.

शेवटी मा. सभापती /मुं.मं., मा. उप सभापती तथा मुख्य अधिकारी /मुं.मं. व सन्मा. सदस्य यांनी आजच्या बैठकीला सहकार्य केले, त्यामुळे आजची बैठक ही योग्य निर्णय होवून, खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली, असे सांगून सचिव /मुं.मं. यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानून आजची बैठक समाप्त झाल्याचे जाहिर केले.

सही/-
सचिव/मुं.मं.

सही/-
सहमुख्य अधिकारी/मुं.मं.

सही/-
मा. मुख्य अधिकारी/मुं.मं.

सही/-
श्री.विरेंद्र उपाध्याय
सदस्य/मुं.मं.

सही/-
श्री.सुनिल नरसाळे
सदस्य/मुं.म

सही/-
(डॉ. अमरजीतसिंग मनहास)
मा.सभापती/मुंबई मंडळ.